Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

अंक २१वा | एप्रिल २०२३

## आमचे ध्येय

***अनेक पिढ्यांपासून चालत आलेले दारिद्र्य-चक्र तोडून एकेक व्यक्तीला सक्षम बनविणे***

गेल्या पंधरावर्षांपेक्षा जास्त कालावधीत आम्ही ३,९८,३२९ हून अधिकग्रामीण भारतीयांचे जीवन प्रभावित करण्यात यशस्वी ठरलो आहोत. संस्थेच्या आनंदो व जागृती प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, समुदाय विकास, कौशल्य विकास, आरोग्यसेवा आणि पर्यावरण संवर्धन असे विविध उपक्रम राबवीत आहोत.

## विश्वस्त मंडळ

- **श्रीमती विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया** – विश्वस्त
- **श्री. मनोज मुरारका** – विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद** – विश्वस्त
- **श्री. ॲश्दीन डॉक्टर** – विश्वस्त

## लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर यांना प्रोकॅम इंटरनॅशनल प्रा.ली. आयोजित चॅरिटी नाईट कार्यक्रमात २ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.






दिनांक २१ मार्च २०२३ रोजी, द ट्रायडंट, मुंबई येथे प्रोकॅम इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड आयोजित चॅरिटी नाईट कार्यक्रमात, श्रीमती विली डॉक्टर, संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट यांना 'चेंज आयकॉन' आणि 'सेकंड हायेस्ट फंडरेझर'या दोन पूरस्कारांनी गौरविण्यात आले. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टसाठी मे २०२० ते एप्रिल २०२२ या कालावधीतविशेष कोविड मोहीमे अंतर्गत निधी उभारणीत त्यांनी केलेल्या प्रशंसनीय प्रयत्नांसाठी हे पुरस्कार देण्यात आले.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा १८वा वाढदिवस साजरा

दिनांक २३ मार्च रोजी **लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट स्थापन** झाल्याला १८ वर्षे पूर्ण झाली. हा दिवस संपूर्ण टीमने उत्साहात साजरा केला.



## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला 'द गिविंग इकॉनॉमी-२०२२' पुरस्कार प्राप्त



दिनांक १५ जानेवारी २०२३ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर यांना २०२२ सालचा, 'द गिव्हिंग इकॉनॉमी पुरस्कार' प्राप्त झाला. हा पुरस्कार क्राउडेरा यांचेकडून, एक उत्कृष्ट आणि मानवी जीवनात बदल घडवून आणणारे परिणामकारक योगदान म्हणून प्रदान करण्यात आला. 'दर्जेदार शिक्षण' या संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास उद्दिष्टाच्या चौथ्या ध्येयाशी संरेखित, मानवतेवर आणि या भूतलावरील जीवनावर परिणाम करण्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला. एस पी जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲंड रिसर्च, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात ॲड. आशिष शेलार, अध्यक्ष भाजपा मुंबई, मानद कोषाध्यक्ष, बीसीसीआय यांच्या हस्ते हा पुरस्कार लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रमेश दासवानी यांनी स्वीकारला.

## टाटा मुंबई मॅरेथॉन २०२३




**टाटा मुंबई मॅरेथॉन २०२३ मध्ये आनंदो प्लस स्टार:** आम्हाला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की,लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या महाराष्ट्रातील अलिबाग केंद्राचा आनंदो प्लसचा विद्यार्थी धीरज पाटील यानेदहा हजर किलोमीटरधावण्यात नववा क्रमांक पटकावला आहे. त्याने ३९.१९ मिनिटांत ही धाव पूर्ण केली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट तर्फे त्याचे अभिनंदन. धीरज पाटील यासत्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा.





**लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या इतिहासात प्रथमच ११ कॉर्पोरेट संघ आणि ६०० व्यक्तींनी सक्रिय सहभाग घेतला. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या माध्यमातून सुरू असणाऱ्या कार्याला पाठींबा म्हणून या मंडळींनी टाटा मुंबई मॅरेथॉन २०२३मध्ये धाव घेतली.**

## अनंत प्रकल्पाच्या विद्यार्थ्यांचा १००% निकाल!



आम्हाला हे सांगताना अभिमान वाटतो की अनंत कार्यक्रमाचे ६५ लाभार्थी गंधर्व महाविद्यालयाच्या शास्त्रीय संगीत परीक्षेत विविध श्रेणींमध्ये यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत. यापैकी २६ विद्यार्थी तबला, १८ विद्यार्थी गायन आणि २२ विद्यार्थी शास्त्रीय नृत्य या प्रकारांत यशस्वी झाले आहेत. १५ विद्यार्थ्यांनी डिस्टिंक्शन मिळवले आहे. अनंतच्या विद्यार्थ्यांना पाठबळ दिल्याबद्दल लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, द फ्लॉवरिंग ट्री इंक., यूएसए या भागीदारांचे कृतज्ञ आहेत. आमच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना भविष्यात मोठे यश मिळावे अशी शुभेच्छा आम्ही देत आहोत.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला पेटीएम वरून
किंवा ऑनलाईन योगदान द्या.

**Contribute Now !**
**paytm**

**https://m.paytm.me/LOLT**

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या उत्पादन विभागाने शिवले ६०० टी-शर्टस्



लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट तिवरे, कर्जत तालुका, रायगड जिल्हा येथे असलेल्या उत्पादन विभागातील महिलांनी, टाटा मुंबई मॅरेथॉन २०२३ मध्ये सहभागी झालेल्या सदस्यांसाठी ६०० टी-शर्ट्सची शिलाई करून शाश्वततेच्या दिशेने एक पाऊल टाकले आहे.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व युनिव्हर्सल बिझनेस स्कूल यांचा संयुक्त कार्यक्रम 'स्मार्ट प्रोग्रॅम' ची सांगता




युनिव्हर्सल बिझनेस स्कूलच्या एम.बी.ए.च्या विद्यार्थ्यांसाठी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या भागीदारीत सुरू असलेला सामाजिक विकास कार्यक्रम म्हणजेच 'स्मार्ट प्रोग्रॅम'चा सांगता समारंभ, दिनांक २८ जानेवारी २०२३ रोजी कर्जत येथील युनिव्हर्सल बिझनेस स्कूलमध्ये आयोजित करण्यात आला होता. यात्प्रसंगी २९१ विद्यार्थ्यांचा स्मार्टप्रोग्राम' यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रमेश दासवानी, कार्यक्रम संचालक, अंडरग्रेजुएट कार्डिफ ब्रिगेडियर प्रा.जी.पी.एस.चीमा, वरिष्ठ सी.एस.आर. व्यवस्थापक, बजाज फिनसर्व्ह लिमिटेड -श्री मृगांका गुल्हाने, एचओडी, मानव संसाधन, सीईओ यूबीएस -डॉ प्रांजली मधुर, एचओडी, वित्त - डॉ. प्रिया सोलोमन, कार्यक्रम संचालक, पोस्ट ग्रॅज्युएट कार्डिफ- प्रा. एलोरा बासुमातरी, संशोधन अधिकारी - प्रा. गुरुप्रसाद इत्यादी मान्यवर तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट कर्मचारी वृंद उपस्थित होते.



## आनंदो व आनंदो प्लस कार्यक्रमाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मनगटी घड्याळांचे वाटप



इयत्ता दहावी–बारावी आनंदो आणि आनंदो प्लस विद्यार्थ्यांना परीक्षेच्या कालावधीत वेळेचे व्यवस्थापन करता यावे या दृष्टीने २७६६ मनगटी घड्याळांचे वाटप केले. जानेवारी २०२३ मध्ये, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने कॉर्पोरेट देणगीदाराच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना ही भेट दिली. आयुष्यात पहिल्यांदाच अशी भेट मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद झाला.

## अहमदनगरमध्ये विज्ञान प्रयोगशाळेची उभारणी आणि स्थापना

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे भागीदार होगनाज इंडिया प्रा. ली. यांच्या सहकार्याने, दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी, अहमदनगर जिल्ह्यातील कौडगावच्या श्री संत लक्ष्मण महाराज विद्या मंदिर शाळेत विज्ञान प्रयोगशाळेचे बांधकाम सुरू करण्यात आले. ही प्रयोगशाळा पूर्णपणे कार्यान्वित झाल्यावर विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील विविध प्रात्यक्षिकांचा अनुभव घेणे व त्याविषयी अधिक ज्ञान मिळविणे शक्य होणार आहे.







## महिला लाभार्थ्यांसाठी पाणीगाड्यांचे वाटप



दिनांक १९ मार्च २०२३ रोजी, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डन आणि आरआर पारकॉन प्रा.लि. यांच्या सहकार्याने लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट यांनी रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील तिवरे येथील जीवन आशा समुदाय केंद्रातील १०० शेतकरी महिलांना पाणीगाड्यांचे वाटप केले. या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डनचे अध्यक्ष श्री. नवनीत अजमेर, श्री. अमरीश दफ्तरी, श्री. दिगंत शाह आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डनचे १३ रोटेरियन सदस्यतसेच आरआर पारकॉन प्रा.ली. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश काबरा उपस्थित होते.

## जागृती प्रकल्पांतर्गत जलस्रोत कार्यक्रम अर्थात विहीर बांधकाम सुरू



राजकमल बजाज फाऊंडेशनच्या भागीदारीतून रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्याच्या ठोंबरवाडी गावात प्रथमच जलस्रोत कार्यक्रमा अंतर्गत विहीर बांधण्याची सुरुवात झाली. दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ रोजी गाव समिती सदस्य, गावचे सरपंच श्री. पिंपरकर आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत विहीर बांधकामाची पायाभरणी करण्यात आली.





### लॉयड्स इन्फिनिट फाऊंडेशनच्या भागीदारीत एएसइपी चंद्रपूर जिल्हा

लॉयड्स इन्फिनिट फाऊंडेशन यांच्या मदतीने आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रम चंद्रपूर तलुक्यातील ३ शाळांमध्ये सुरू करण्यात आला. यामध्ये ९७५ विद्यार्थी आणि २७ शिक्षक समाविष्ट आहेत.

## सौरभ, आम्हाला तुझा अभिमान वाटतो.



आम्हाला सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, संस्थेच्या आनंदो प्लसच्या अलिबाग केंद्रातील लाभार्थी सौरभ खळे याने अलिबाग मॅरेथॉनमध्ये धावण्यात प्रथम क्रमांक पटकावला. रु. ८०००/- व सहभागाचे प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. रायगड जिल्ह्याच्या आरोग्य विभागाने महाराष्ट्र शासनाच्या माणुसकी प्रतिष्ठान यांच्या सोबत हे मॅरेथॉन संयुक्तपणे आयोजित केले होते.

## विकेश, आम्हाला तुझा अभिमान वाटतो.



संस्थेच्या वाशीम जिल्ह्यातील वाई केंद्रातील आनंदो प्लस विद्यार्थी विकेश भगतयांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS), हैदराबाद येथून कला (नैसर्गिक संसाधने आणि प्रशासन) पदवी पूर्ण केली. त्याला कॅम्पस प्लेसमेंटमधून ''फाऊंडेशन ऑफ इकोलॉजिकल सिक्योरिटी' या संस्थेत सहयोगी प्रकल्प व्यवस्थापक म्हणून, वार्षिक रू. ५.४० लाख इतक्या पगारावर नोकरी मिळाली आहे. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट त्यांना उज्वल भविष्य आणि सुयश चिंतिते.

## आकाश, आम्हाला तुझा अभिमान वाटतो.



आम्हाला सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, संस्थेच्या कर्जत तालुक्यातील कोंदिवडे केंद्रातील अनंत प्लस कार्यक्रमातील विद्यार्थी आकाश देशमुख याने हर्मोनियम वाजवण्याच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. ही वाद्य वादन स्पर्धा कोंकण ज्ञानपीठ इंजिनिअरींग कॉलेज यांनी आयोजित केली होती.

## शारुख, आम्हाला तुझा अभिमान वाटतो.




आम्ही अभिमानाने सांगतो की आमच्या वाशीम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील किन्हीराजा केंद्राचा आनंदो प्लस विद्यार्थी शारुख पठाणयाने वाशिममध्ये 'पेस कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट' हा स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. हा व्यवसाय सुरु करण्यापूर्वी त्याने वाशीम येथून बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (बीसीए) पूर्ण केले आहे. स्वत:चे संगणक केंद्र असावे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याने अभ्यास करता करता अर्धवेळ काम केले. आता त्यांची स्वत:ची MKCL मान्यता प्राप्त संस्था आहे. MSCIT अभ्यासक्रमासाठी आधीच २० विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट कडून त्याला त्याच्या भावी प्रयत्नांसाठी खूप शुभेच्छा



## अक्षय, आम्हाला तुझा अभिमान वाटतो.



आम्हाला सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, संस्थेच्या वाशीम जिल्ह्यातील मनोरा केंद्रातील आनंदो प्लस विद्यार्थी अक्षय कांबळे याने अमरावती येथून अभियांत्रिकी पदवी (इ.ए) यशस्वीपणे पूर्ण केली आहे, त्याला हैदराबादमधील एका सॉफ्टवेअर कंपनीत सॉफ्टवेअर टेस्टिंग इंजिनिअर म्हणून नोकरी मिळाली आहे. प्रतिवर्षी रु.४.५० लाख इतका त्याचा पगार असणार आहे. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट तर्फे अक्षयला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा

**लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट बिल डेस्कसह भागीदार आहे आणि आता ४७ बँकांसह बिल पे टॅबवर लाइव्ह आहे.**

DBS | DCB BANK | HDFC BANK | IndusInd Bank | kotak | standard chartered | YES BANK

## महिला दिन साजरा




अकोला जिल्ह्यातील शिवार या गावी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व त्यांचे भागीदार रॅलिस इंडिया लिमिटेड यांनी संयुक्तपणे महिला दिन साजरा केला. या प्रसंगी श्री संजीव लाल (व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, रॅलिस इंडिया लिमिटेड), श्रीमती जिज्ञासा कुर्लापकर (प्रमुख – कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी आणि सकारात्मक कृती, रॅलिस इंडिया लिमिटेड) आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट टीम तसेच रॅलिस इंडिया लिमिटेड मधील इतर मान्यवर उपस्थित होते. महिला लाभार्थींनी नाट्य स्पर्धा, नृत्य स्पर्धा, खेळ इत्यादींमध्ये सहभाग घेतला. त्यांना कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. धसई केंद्र तालुका मुरबाड, तळोदा केंद्र जिल्हा नंदुरबार, तिवरे व कडाव केंद्र तालुका कर्जत आणि मुंबईतील वरळी आणि कफ परेड या केंद्रांमध्ये ही महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.


धसई


तळोदा


तिवरे


कडाव


वरळी


कफ–परेड

## बाल कला मोहोत्सव

संस्थेच्या सर्व आनंदो केंद्रांवर आनंदोच्या लाभार्थ्यांसाठी लाईट ऑफ लाईफ संस्थेचा वार्षिक कार्यक्रमबाल कला महोत्सव आयोजित करण्यात आला होता. ओडिशा राज्यातील अंगुल तालुक्यातील केंद्राच्या मुलांसाठी यावर्षी प्रथमच बाल कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.









**E**ducate - (शिक्षण)
**E**mpower - (सक्षमीकरण)
**E**mployability - (रोजगार)

## युवा मोहोत्सव

संस्थेच्या सर्व आनंदो प्लस केंद्रांवरील लाभार्थ्यांसाठी संस्थेचा वार्षिक कार्यक्रम, युवा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यवतमाळ तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी प्रथमच युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.





## इनर व्हील क्लब ऑफ बॉम्बे पिअर यांचे पाठबळ

इरव्हील क्लब ऑफ बॉम्बे पिअरच्या सहाय्याने, दिनांक २१ मार्च २०२३ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रमेश दासवानी यांच्या हस्ते कफ परेड, मुंबई येथे असलेल्या महिला सक्षमीकरण केंद्रातील इच्छुक महिला लाभार्थ्यांना २ टेलरिंग मशीन संच आणि २ ब्युटीशियन संचांचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.



## संस्थेबरोबर भागीदारी करण्यासाठी इच्छुक भागीदारांच्या भेटी



दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी, ग्रुप कॅप्टन परमजीत एस अहलुवालिया, M.SC MAESL मधील APTI चे प्रोप्रायटर व प्रशिक्षण प्रमुख, डॉ. विवेक जी मेंडोन्सा, ग्रुप डायरेक्टर, मार्केटिंग LYNX लॉरेन्स अँड मेयो, लॉरेन्स अँड मेयो ड्रोन ट्रेनिंग अकादमी आणि श्रीमती कमल दमानिया, मुख्य कार्यवाही अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, यांनी जीवन आशा कम्युनिटी सेंटर, तिवरे, कर्जत तालुका येथे भेट दिली. ही भेट म्हणजे जीवन आशा कम्युनिटी सेंटर येथे ड्रोन अकादमी स्थापन करण्याच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल होते.

## संस्थेबरोबर भागीदारी करण्यासाठी इच्छुक भागीदारांच्या भेटी



दिनांक ३ मार्च २०२३ रोजी, डॉ. स्वाती एस. मुजुमदार, प्रिन्सिपल डायरेक्टर - सिम्बायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटी, डायरेक्टर - सिम्बायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग, प्रो चांसलर - सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीज (पुणे आणि इंदूर) त्यांच्या टीमसह आणि डॉ. विवेक जी मेंडोन्सा, LYNX लॉरेन्स अँड मेयो मार्केटिंगचे ग्रुप डायरेक्टर यांनी कर्जत तालुक्यातील तिवरे गावातील जीवन आशा कम्युनिटी सेंटरला भेट दिली आणि प्रोजेक्ट आनंदो आणि प्रोजेक्ट जागृती आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट टीमच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला.

## संस्थेबरोबर भागीदारी करण्यासाठी इच्छुक भागीदारांच्या भेटी



दिनांक ३ मार्च २०२३ रोजी, श्री सुमीत लाल (सीओओ- कोटक एज्युकेशन फाऊंडेशन), श्री जेसील किनी (व्यवस्थापक प्रशिक्षण - कोटक एज्युकेशन फाऊंडेशन), श्रीमती प्रियांका राज (कॉर्पोरेट नेटवर्किंग - कोटक एज्युकेशन फाऊंडेशन) आणि श्रीमतीलविना डिसा ( क्लस्टर हेड - कोटक एज्युकेशन फाऊंडेशन) यांनीही कर्जत तालुक्यातील तिवरे गावातील जीवन आशा कम्युनिटी सेंटरला भेट दिली. श्रीमती विली डॉक्टर, संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, श्री रमेश दासवानी, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीमती कमल दमानिया, मुख्य कार्यवाही अधिकारीतसेच संस्थेची टीम, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट संस्थेच्या उपक्रमांची माहिती सामायिक करण्यासाठी उपस्थित होते. जीवन आशा कम्युनिटी सेंटर येथे वृक्षारोपण कार्यक्रमातही मान्यवरांनी सहभाग घेतला

## संपर्क


**मुख्य कार्यालय**

वन बीकेसी, सी-विंग, युनिट क्रमांक: १५१९, प्लॉट नं.: सी-६६,
जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पु),
मुंबई - ४०० ०५१. दूरध्वनी: +९१ २२ ६९०४ ७४७०
ईमेल: connect@lightoflifetrust.org

**शाखा कार्यालये:**

**महाराष्ट्र :** अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ
**मध्य प्रदेश :** सिवनी **ओडिशा :** अंगुल
**राजस्थान :** बिजोलिया, सिकर

www.lightoflifetrust.org +91-9820229445


**Social Media Followers**

| Facebook | Instagram | Twitter | LinkedIn | YouTube |
|---|---|---|---|---|
| @LightOfLifeTrustIndia | @lightoflifetrust_lolt | @lightoflifetrst | lightoflifetrust | youtube.com/c/lightoflifetrust |
| ८६८४ | २७९५ | ३३० | २२७४ | ४७६४ |

## संस्थेबरोबर भागीदारी करण्यासाठी इच्छुक भागीदारांच्या भेटी



दिनांक २४ मार्च २०२३ रोजी, डॉ. माधवी पेठे, सीईओ, हेड ऑफ डिपार्टमेंट रचना संसद शाळा आणि संस्था यांनी कर्जत तालुक्यातील तिवरे गावातील जीवन आशा समुदाय केंद्रालाभेट दिली. श्रीमती विली डॉक्टर, संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, श्री. रमेश दासवानी, मुख्य कार्यकारी अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आणि संस्थेचे कर्मचारी वर्ग यावेळेस उपस्थित होते. पाहुण्यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरिष्ठ व्यवस्थापन तसेच आनंदो प्लस लाभार्थ्यांशी संवाद साधून,रचना शाळेमध्ये शिकविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांबद्दल समजावून सांगितले. यामुळे लाभार्थ्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या करिअर संधींबद्दल माहिती मिळण्यास मदत झाली. त्यानंतर तिवरे गावातील जीवन आशा कम्युनिटी सेंटर येथे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.